# मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालय, जुने सचिवालय आवार, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२.

**email: ctcourt-mum@nic.in**

**फोन नं. ०२२—२२८४ ४१३४**

## जाहीर सूचना

नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई, या कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत मा. न्यायाधीश व कर्मचारी यांना नव्याने ओळखपत्र (लॅमिनेशनसहित) देण्याची प्रक्रिया सुरु केली असून अंदाजे १००० नवीन ओळखपत्र देण्याचे प्रस्तावित आहे. तरी संबंधिताकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

तरी स्वारस्य असलेल्या संबंधित फोटोस्टुडिओ यांच्याकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदा मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| १. | संबंधित फोटोस्टुडिओ यांनी पूर्वी शासन स्तरावरच्या अशाप्रकारच्या प्रक्रियेत सहभाग घेतलेला असावा. |
| २. | मोहोरबंद लिफाफ्यातील दरपत्रक प्रस्तुत जाहीर सूचना प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत (दिनांक १९.०४.२०२५ ते २५.०४.२०२५ सार्वजनिक सुटटीवगळता, हमदस्त (By Hand) अथवा टपालाद्वारे (By Post/RPAD/Speed Post etc) प्रबंधक, नगर दिवाणी न्यायालय, जुने सचिवालय आवार, मुंबई—४०० ०३२ या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० दरम्यान पोहोच होतील याची दक्षता घ्यावी. उपरोक्त मुदती पश्चात प्राप्त मोहोरबंद लिफाफ्यांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही अथवा अपात्र ठरविण्यात येतील. |
| ३. | मोहोरबंद लिफाफ्यावर **“ ओळखपत्र निविदा”** असे स्पष्ट लिहावे. स्पष्ट उल्लेख नसलेले मोहोरबंद लिफाफ्यांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही. |
| ४. | उपरोक्त परिच्छेद ३ प्रमाणे विहित मुदतीत प्राप्त झालेले मोहोरबंद लिफाफे दिनांक २८.०४.२०२५ रोजी दुपारी २:१५ वाजता न्यायालय क्र. ४५ शेजारील कक्ष, दुसरा मजला, नवीन इमारत, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई—४०० ०३२, येथे उघडण्यात येतील. केवळ पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या |

| | |
|---|---|
| | किंमतीचे दरपत्रक विचारात घेण्यात येतील आणि खरेदीचा निर्णय न्युनतम—१ (L-1) च्या आधारे घेण्यात येईल. |
| ५. | मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या दिवशी व वेळी संबंधित फोटोस्टुडिओचे अधिकृत प्रतिनिधीनी उपस्थित रहावे. ज्या फोटोस्टुडिओचे अधिकृत प्रतिनिधी वरील दिवशी व वेळी उपस्थित राहणार नाहीत त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ६. | कमीत कमी तीन वेगवेगळया फोटोस्टुडिओ मधून मोहोरबंद लिफाफ्यात दरपत्रक प्राप्त न झाल्यास सदर प्रक्रियेला एका आठवडयाची मुदतवाढ देण्यात येईल आणि मुदतवाढीत आवश्यक दरपत्रके प्राप्त न झाल्यास प्रक्रिया पुन्हा नव्याने राबविण्यात येईल. |
| ७. | सदर ओळखपत्राची प्रत्यक्ष किंमत कमी/जास्त प्रमाणात करण्यात येईल आणि त्यासंबंधी संबंधितास कोणताही आक्षेप राहणार नाही. |
| ८. | देयक रक्कम प्रदान करतेवेळी कोणतेही अतिरिक्त शुल्क/विलंब आकार अदा केले जाणार नाही. |
| ९. | पुरविण्यात आलेले ओळखपत्रामध्ये काही चूक असल्यास अथवा खराब असल्यास, संबंधित फोटोस्टुडिओ यांना .स्व:खर्चाने सदर ओळखपत्र बदलून दयावे लागेल. |
| १०. | निधीच्या उपलब्धतेनुसार ओळखपत्रांच्या संख्येला कमी/ जास्त करण्याचे अधिकार मा. पत्रव्यवहार समितीकडे राहतील. |
| ११. | वरील प्रक्रियेचे सर्व अधिकार मा. पत्रव्यवहार समितीकडे राहतील. |

ठिकाण: मुंबई

(कल्पा रा. देसाई) 17/4/2025

प्रबंधक

दिनांक: १७.०४.२०२५.

नगर दिवाणी व सत्र न्यायालय,

## नमुना दरपत्रक प्रपत्र ( SPECIMEN)

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | : | खालील तक्त्याप्रमाणे ओळखपत्र नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई यांचे कार्यालयास पुरवठा करणे |
| फोटोस्टुडिओचे नाव | : | |
| फोटोस्टुडिओचा संपूर्ण पत्ता | : | |
| फोटोस्टुडिओचा संपर्क दूरध्वनी | : | |
| फोटोस्टुडिओचा नोंदणी कमांक | : | |
| फोटोस्टुडिओचा वस्तू व सेवा कर कमांक | : | |

| अ.क | तपशील | मागणी करण्यात आलेल्या एका ओळखपत्राची किंमत (रुपये) | सेवा कर (रुपये) | एकूण किंमत सेवा करासहित (रुपये) (स्तंभ ३+४) |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | लॅमिनेटेड ओळखपत्र | | | |
| २ | पारदर्शी कार्ड होल्डर | | | |
| ३ | कार्यालयाच्या नावाचे स्ट्रिंग | | | |
| | एकूण | | | |

________________________________

(फोटोस्टुडिओचे नाव, सही, शिक्का, दिनांक)

टिप:— स्तंभ क. ३ ते ५ मधील माहिती फोटोस्टुडिओनी भरावयाची आहे.